# श्रीरामपूर नगरपरिषद, श्रीरामपूर, जि.अहमदनगर

## जाहीर सुचना

**जा.क्र.व.शि.८२२०२२-४१२६** **दिनांक :-१७/११/२०२२**

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षणाकरिता श्रीरामपूर नगरपरिषद, श्रीरामपूर मार्फत निव्वळ कंत्राटी पध्दतीने ११ महिन्यांसाठी शहर समन्वयक (City Co-ordinator) ची नियुक्ती करावयाची आहे. सदरील कंत्राटी पद भरण्यासाठी दि.१८/११/२०२२ ते दि.२४/११/२०२२ अखेर सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत कायालयीन वेळेत श्रीरामपूर नगरपरिषद, श्रीरामपूर येथे विहित नमुन्यात अर्ज आवश्यक कागदपत्रांसह सिलबंद लिफाफ्यात स्विकारण्यात येणार आहे. तरी इच्छुक/पात्र उमेदवारांनी आवश्यक त्या शैक्षणिक, अनुभव प्रमाणपत्र व इतर आवश्यक कागदपत्रांसह अर्ज विहित मुदतीत सादर करावा.

| पदाचे नाव | एकूण पदे | शैक्षणिक अर्हता | मासिक मानधन |
|---|---|---|---|
| शहर समन्वयक (City Co-ordinator) | ०१ | १) मान्यताप्राप्त विद्यापीठातील खालील पैकी कोणत्याही शाखेतील पदवी<br>अ) बी.ई. / बी.टेक. (कोणतीही शाखा)<br>ब) बी.आर्क<br>क) बी.प्लॅनिंग<br>ड) बी.एस.सी. (कोणतीही शाखा)<br>२) अनुभव - स्थानिक स्वराज्य संस्था (नागरी) कार्यालयाशी निगडित कामाचा किमान ६ महिन्यांचा अनुभव आवश्यक आहे. | ४५,०००/- |

**<u>अटी व शर्ती-</u>**

१) सदर पदाकरिता विहित नमुन्यातील अर्ज, फॉर्म व इतर माहिती दिनांक १८/११/२०२२ ते २४/११/२०२२ पर्यंत कार्यालयीन वेळेत आरोग्य विभागाकडून प्राप्त करता येईल. तसेच इतर शर्ती व अटी आरोग्य विभागाकडे पहावयास मिळतील.

२) वयोमर्यादा - कमाल वयोमर्यादा ३५ वर्ष (शहर समन्वयक म्हणून अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारास अनुभव वयोमर्यादा शिथील असेल.)

३) उमेदवारांनी अर्जासोबत सादर केलेल्या आवश्यक कागदपत्रांची पडताळणी नगरपरिषद स्तरावर केली जाईल. पडताळणीत पात्र ठरणाऱ्या उमेदवारास मुलाखतीस उपस्थित राहणेबाबत कळविले जाईल.

४) प्राप्त होणारे अर्ज एक अथवा सर्व नाकारण्याचे अधिकार मुख्याधिकारी यांनी राखून ठेवले आहेत.

५) अर्जदाराच्या कोणत्याही शर्ती किंवा अटी मान्य करण्यात येणार नाही.

६) विहित मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. ई-मेलव्दारे सादर केलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

७) सदरची नियुक्ती निव्वळ कंत्राटी स्वरुपात असल्याने कोणतेही शासकीय लाभ प्रत्यक्षपणे अथवा अप्रत्यक्षपणे मिळणार नाहीत अथवा कोणतेही प्रकारचे वेतन भत्ते अदा केले जाणार नाहीत. तसेच नोकरीवर हक्क सांगता येणार नाही.

सही

**(गणेश शिंदे)**

मुख्याधिकारी,

श्रीरामपूर नगरपरिषद, श्रीरामपूर